FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य / State: महाराष्ट्र, जिल्हा / District: मुंबई, पोलीस ठाणे / Police Station: ला.प्र.वि, पहिली खबर क्र. / FIR No.: २८, वर्ष / Year: २०१९, दिनांक / Date: २९/०८/२०१९

2. (i) अधिनियम Act: प्र.भ्र. अधिनियम १९८८ (सुधारित अधिनियम २०१८), कलमे Sections: कलम ७
   (ii) अधिनियम Act ……, कलमे Sections ……
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ……

3. (a) अपराधाची घटना : वार / Occurrence of offence : Day: गुरुवार, तारीख पासून / Date from: २९/०८/२०१९, वेळ / Time ……, तारीख पर्यंत / Date to: ३०/०८/२०१९, वेळ / Time ……
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा / Information received at P.S. तारीख / Date: २९/०८/२०१९, वेळ / Time ……
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. / General Diary Reference : Entry No.: ०१/२०१९, तारीख / Date: ३०/०८/२०१९, वेळ / Time ……

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ……

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण / Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा / Direction and distance from P.S.: अंदाजे ११ कि.मी. पश्चिमेस, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. / Chouki/Beat/O.P. Name and No. ……
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव / Address of Occurrence Name: सत्र न्यायालय, मुंबई, ठिकाणाचे नंबर / No. if any: कोर्ट क्र. ५५, गल्ली / Ward ……, रस्त्याचे नाव / Name of road ……
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण / Nearest identifiable Place ……, गाव / Village ……, पोस्ट / Post ……, तालुका / Taluka: मुंबई, जिल्हा / Distt.: मुंबई, राज्य / State: महाराष्ट्र
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव / In case, outside the limit of this Police Station ……, तालुका / Taluka ……, जिल्हा / Distt. ……, राज्य / State ……

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name: श्री. सुलतान, (b) वडीलाचे / पतीचे नाव / Father's /Husband's Name: मुबारक अली मन्सुरी
   (c) जन्म तारीख व वय / Date of Birth & Age: ५२ वर्षे, (d) राष्ट्रीयत्व / Nationality: भारतीय, फोन नं. / Phone No.: ९९५९५५७५४३५
   (e) पारपत्र क्रमांक / Passport No. ……, दिल्याचा दिनांक / Date of Issue ……, दिल्याचे ठिकाण / Place of Issue ……, (f) व्यवसाय / Occupation: गारमेंट व फर्निचर
   (g) धर्म Religion: मुस्लीम, जात Caste ……, जनजात Sub-Caste ……
   (h) पत्ता / Address: रुम नं. ३४१, गुप्ता वाडी, गल्ली / सुर्वे नं. / Ward ……, घर / नाव नंबर / House/Name No.: ५१४९८, फोन / मो. नंबर / Phone/M. No.: भारतीय विद्याभवन समोर, पॅन नं. / Pan No. ……, वोटर्स नं. / Card No.: BXAPM7847P
   रस्त्याचे नाव / Road: एस.व्ही. रोड, जवळचे प्रसिद्ध ठिकाण / Nearest identifiable place ……, गाव / Village: वांद्रे (प.), पोस्ट / Post ……, पो. स्टे. / P. Stn.: वांद्रे पो. ठाणे
   तालुका / Taluka: मुंबई, जिल्हा / Distt.: मुंबई, राज्य / State: महाराष्ट्र, सध्याचा पत्ता / Present Address ……

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   श्री. मंगेश सदाशिव आरोटे, वय = ३९ वर्षे, धंदा - नोकरी - अतिरिक्त सरकारी अभियोक्ता, वर्ग सत्र न्यायालय, मुंबई, कोर्ट क्र. ५५. रा.ठि. २०१, बी कुणाल को.ऑ.हौ.सो.लि कोपरखैरणे सेक्टर - ४ - ए, नवी मुंबई, मोबाईल क्र. ९८७०४५१५८४५५.

Scanned by CamScanner

खालील फिर्यादि श्री. सुलतान शौकत अली अन्सारी, वय - ६२ वर्षे
धंदा - व्यवसाय - गारमेन्ट व फर्निचर, रा. ठि. बि. नं. ३४१, रु. नं. ८
चुनावाला मॅन्शन, ओडिया बिल्डींग समोर, बझार रोड, वांद्रे (प) मुंबई-५०
यांचा दिनांक - २९/०८/२०१८ रोजीच्या मराठीत टंकलिखित केलेला फिर्यादी
जबाब हिच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात आली असून,
सोबत जोडण्यात आली आहे.

समक्ष

[signature] ३०/८/१९

( उमेश आठेरे )
पोलीस निरीक्षक
को. प्र. विभाग, मुंबई.

[signature]
30/8/19

Scanned by CamScanner

१५

## फिर्याद

दि. २९/०८/२०१९

श्री. सुलतान शौकत अली मन्सुरी, वय ६२ वर्ष, धंदा – व्यवसाय (गारमेंन्ट व फर्निचर तयार करणे), रा.ठि. ३४१, चुनावाला मंजिल बाजार रोड, वांद्रे पश्चिम, मुंबई ४०० ०५०. मो. क्र.९९६९६७६४३५. आधार कार्ड नं. ८०९२ ७२७५ ७७७२.

———

मी वरीलप्रमाणे असून नमुद पत्त्यावर जन्मापासून माझे कुटुंबियांसह रहावयास आहे. मी सन २०१३ पासून गारमेंन्ट व फर्निचर तयार करण्याचा व्यवयास करत असुन, माझे दुकानाचे नाव फॅशन झोन असे असुन, ते १/ए, कॅनल वर्थ, आर.के. मॉल, ३३ वा रोड, लिकिंक रोड, खार पश्चिम, मुंबई ४०००५२ येथे आहे. सदर व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नावर मी माझ्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करीत आहे.

फिर्यादी श्रीमती. शैला कोटीनो, वय ८० वर्षे, रा.ठी. बांद्रा, मुंबई, यांनी मा. न्यायालयात दिलेल्या तक्रारी वरून, फौ.दं.प्र.सं. १५६(३) अन्वये प्रथम बांद्रा पोलीस ठाणे येथे, एमईसीआर क्र. ०१/२००४, कलम ४६३, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब), भादवि, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. त्यानंतर सदर गुन्हा पुढील तपासाकरीता, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि. युनिट–९, (गुन्हे शाखा), मुंबई येथे वर्ग केल्याने, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि. युनिट–९ येथे एमईसीआर क्र. ०१/२००६, कलम ४६३, ४६७, ४६८, ४७१, २०१, १२०(ब), भादवि, अन्वये नमुद गुन्हा नोंद करून त्याचा तपास सुरू होता. सदर गुन्हयात मी व इतर १० असे एकूण ११ जण आरोपी होतो. आम्ही सर्वजण जामीनावर आहोत. सन २०११ मध्ये सदर गुन्हयात मी जामीना करीता मा. न्यायालयाने दिलेल्या अटी व शर्तीचे पालन व गुन्हयाचे तपासात सहकार्य करीत नसल्याचे कारणास्तव मला पुन्हा अटक करण्यात आली होती व सदर गुन्हयाचे कलमात कलम २५५,२५९,२६० भादवी याची वाढ करण्यात आली होती. सदर गुन्हा सेशनकोर्ट कमीट झाला होता. सदर वेळी मला पुन्हा नव्याने जामीन मिळाला होता. त्यानंतर सदर गुन्हयाचे दोषारोपपत्र सन २०१३ मध्ये दाखल करण्यात आले असुन, मा. सत्र न्यायालय, कोर्ट क्रमांक १७, मुंबई येथे सदर गुन्हयाची सुनावणी सुरू आहे. त्याचा कोर्ट केस क्रमांक १०१८/२०१३ असा असुन, सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे. सदर गुन्हयात सन २०१५ पासुन सरकारी वकील म्हणुन अतिरीक्त सरकारी अभियोक्ता मंगेश आरोटे हे काम करीत असुन, त्यांनी याआधी विविध कारणास्तव वेळोवेळी माझेकडून पैसे घेतलेले आहेत.

दिनांक २८/०८/२०१९ रोजी सदर गुन्हयाच्या सुणावणीची तारीख होती, त्या दिवशी मी व माझेवतीने ॲडव्होकेट प्रशांत पांडे हे हजर होते. त्यावेळेस अतिरीक्त

समक्ष
(उमेश [illegible])
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Sultan
30/8/19

Scanned by CamScanner

श्री. सुलतान शौकत अली मन्सुरी यांची दि. २९/०८/१९ रोजीची फिर्याद पुढे चालु.....

सरकारी अभियोक्ता श्री. मंगेश आरोटे हे देखील सुनावणीकरीता कोर्ट रूममध्ये हजर होते.

गुन्हयाच्या सुणावणी नंतर सदर केससंदर्भात अतिरीक्त सरकारी अभियोक्ता मंगेश आरोटे यांच्याशी चर्चे दरम्यान, त्यांनी सदर केसमधून डिस्चार्ज करण्यासाठी माझेकडुन पाच लाख रूपयांची मागणी केली होती. परंतु ऐवढे पैसे देण्यास मी असमर्थ असल्याचे त्यांना सांगीतले. त्यानंतर अतिरीक्त सरकारी अभियोक्ता मंगेश आरोटे यांनी मला त्याच दिवशी सांयकाळी ०५:०० वा. कोर्टात येऊन भेटण्यास सांगीतले.

सांयकाळी ०५:०० वा. सरकारी अभियोक्ता मंगेश आरोटे हे माझे जवळ पुन्हा पैश्याची मागणी करणार याबाबत मला खात्री असल्याने व अतिरीक्त सरकारी अभियोक्ता मंगेश आरोटे यांना पैसे देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक २८/०८/२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, वरळी, मुंबई विभागाशी संपर्क साधण्याचे ठरविले.

त्याप्रमाणे मी दिनांक २८/०८/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे येवुन पो.नि. उमेश गौंड यांचेकडे श्री. आरोटे यांचे विरुध्द स्व:हस्ताक्षरात तक्रार केली. पो.नि. उमेश गौंड यांनी माझी लेखी तक्रार घेवुन माझे तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचा समक्ष पडताळणी करण्यात येईल असे सांगुन त्वरीत दोन शासकीय पंचाना पाचारण केले. त्यानंतर मी, पंच व पोलीस पथकासह सत्र न्यायालय, मुंबई येथे जावुन श्री. आरोटे यांना समक्ष भेटुन माझे तक्रारीची पडताळणी करण्यात आली.

सदर पडताळणी दरम्यान श्री. आरोटे यांनी केसमधुन डिस्चार्ज करण्यासाठी रूपये ५०,०००/— इतक्या रक्कमेची लाच मागून सदर रक्कम आज दिनांक २९/०८/२०१९ रोजी सकाळी ११:०० ते ११:३० वा. चे दरम्यान सत्र न्यायालय कोर्ट रूम नं. १६ जवळ आणुन देण्यास सांगुन, येत्या सहा महीने ते वर्षभरात सदर केस संपवून टाकू असे त्यांनी सांगितले.

मी दिनांक २८/०८/२०१९ रोजी लोकसेवक अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्री. मंगेश आरोटे यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारी संदर्भात पडताळणी कारवाई दरम्यान लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने, आज दिनांक २९/०८/२०१९ रोजी सापळापुर्व/सापळा कारवाई आयोजित करणार असल्याने, माझे वैयक्तिक बचतीमधुन लाचेची रक्कम रु. ५०,०००/— (भारतीय चलनातील रु. २०००/— च्या २५ नोटा) घेवून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात हजर झालो. पो.नि उमेश गौंड हे मला पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षामध्ये घेवून गेले. तेथे हजर पोलीस कर्मचारी याचे मदतीने डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पो.नि.उमेश गौंड, माझे व पंचांचे वक्तव्य रेकॉर्डींग केले.

समक्ष,

( उमेश गौंड )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned by CamScanner

श्री. सुलतान शौकत अली मन्सुरी यांची दि. २९/०८/१९ रोजीची फिर्याद पुढे चालू.....

सदर ठिकाणी सापळा कारवाईत सहभागी होणारे अधिकारी व अंमलदार हजर होते. स.पो.आ. चौधरी व पो.नि. उमेश गौंड यांनी सापळापुर्व कारवाई बाबतच्या योग्यत्या सुचना दिल्या. सदर वेळी मी माझेकडील रक्कम रु. ५०,०००/— (भारतीय चलनातील रु. २०००/—च्या २५ नोटा) पो.नि. उमेश गौंड यांचेकडे दिले. तद्नंतर पो.नि. उमेश गौंड यांनी मी दिलेल्या सर्व नोटांचे पोलीस अंमलदारांमार्फत झेरॉक्स काढल्या. दरम्यान मला पंचासमक्ष अॅथ्रसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून अल्ट्रावायलेट लाईटचा वापर करून प्रत्याक्षिक करून दाखविले. तदनंतर मी दिलेल्या नमुद नोटांच्या दोन्ही बाजूस अॅथ्रेसिन पावडर लावून, सदर रक्कम माझे पॅन्टचे पुढील उजव्या खिशात ठेवली. लोकसेवकाने पैसे स्विकारल्या नंतर इशारा म्हणून सापळा पथकास समजण्यासाठी, मी डाव्या हाताने डोक्यावर खाजवून पथकास इशारा देण्याबाबत मला सुचना दिल्या. त्यांनतर पो.नि. उमेश गौंड यांनी ब्युरो कार्यालयातच सापळापुर्व कारवाई पुर्ण करून पुढे सापळा कारवाईचे आयोजन केले.

तद्नंतर मी पो.नि. उमेश गौंड, सपोआ चौधरी पोलीस पथक, पंच असे दोन पोलीस वाहनांमधून मा. शहर दिवाणी सत्र न्यायालय, मुंबई येथे रवाना झालो. तत्पुर्वी सापळा पथकात काम करणाऱ्या अंमलदारांशी माझी ओळख करुन दिली. त्यांनतर कोर्टापासून कांही अंतरावर आमची वाहने गेली असता, ती रस्त्याच्या कडेला थांबवून पो. नि. उमेश गौंड यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, माझे शर्टाचे आतिल बनियनला लावला. त्यानंतर पो.नि. उमेश गौंड यांनी माझे सोबत पंच श्री. वल्लेपवाड यांना पाठविले. व ते वर नमूद पथकासह माझे मागोमाग कोणालाही संशय येणार नाही असे आले. त्यांनतर मी अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्री. मंगेश आरोटे यांना भेटण्यासाठी १६ वे कोर्ट, सत्र न्यायालय, मुंबई येथे न्यायालयाचे दालनात गेलो. सदरवेळी पो.नि. उमेश गौंड यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे पंच व इतर सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार हे ठरल्याप्रमाणे सत्र न्यायालय मुंबई येथील दुसऱ्या मजल्यावरील कोर्ट रूम नं. १६ च्या बाहेरील मोकळया जागेत थांबून राहीले. तेथे लोकसेवक अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्री. मंगेश आरोटे हे खुर्चीवर बसलेले होते. त्यावेळी मी श्री. आरोटे यांच्या उजव्या बाजुचे खुर्चीवर जावून बसून, माझे कामासंदर्भात चर्चा केली. लोकसेवक श्री. मंगेश आरोटे यांनी मला पैशाबाबत विचारणा केली असता, मी माझे पॅन्टच्या पुढील उजव्या खिशातील रूपये ५०,०००/— (भारतीय चलनातील रु. २०००/—च्या २५ नोटा) असलेले नोटांचे बडल त्यांना दिले. त्यांनी ते उजव्या हाताने स्विकारून डाव्या हातात घेतले व त्यांच्या नेसणीस असलेल्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवले व मला जाण्यास सांगितले. त्यानुसार मी बाहेर येवून सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी

समक्ष,

(उमेश गौंड) 30/8/19

पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

30/8/19

Scanned by CamScanner

यांना दिसेल अशा पध्दतीने लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत डाव्या हाताने डोक्यावर खाजवून पुर्व नियोजित इशारा केला. त्यानंतर पंच व सापळा पथकातील अधिकारी आणि अंमलदार यांनी कोर्ट रूम क्र. १६ मध्ये प्रवेश केला व लोकसेवक अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्री. मंगेश आरोटे यांना अटकाव केला. त्यानंतर सपोआ चौधरी, पो.नि. उमेश गौंड यांनी स्वत:ची ओळख त्यांना सांगितली. त्यानंतर पो.नि.उमेश गौंड यांनी मला बोलावून लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, सदर रक्कम लोकसेवक श्री. मंगेश आरोटे यानी त्यांचे पॅन्टचे पुढील डाव्या खिशात ठेवली असल्याचे सांगितले. लोकसेवक श्री. मंगेश आरोटे यांनी लाचेची मागणी केलेली रक्कम स्विकारली असल्याने त्यांना नमूद पथकाने ताब्यात घेतले. दरम्यान लाचेची स्विकारलेली रक्कम पंच श्री. वल्लेपवाड यांनी लोकसेवक श्री. मंगेश आरोटे यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशातून काढून घेवून आम्हा समक्ष सदर रक्कम मोजली व खात्री केली असता, ती मी दिलेल्या रु. ५०,०००/— (भारतीय चलनातील रु. २०००/— च्या २५ नोटा) असल्याचे दिसून आले.

तरी लोकसेवक अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्री. मंगेश आरोटे यांनी माझे विरुध्द मा. १६ वे न्यायालय, शहर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई येथे चालू असलेल्या गन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.वि. युनिट —९, (गुन्हे शाखा), मुंबई येथील एमईसीआर क्र. ०१/२००६, कलम ४६३, ४६७, ४६८, ४७१, २०१, १२०(ब), २५५, २५९, २६०, ३४ भादवि, कोर्ट केस क्रमांक १९/आयॲन्डआर/२००४ या गुन्हयातून मला डिस्चार्ज करण्यासाठी, माझेकडे ५,००,०००/— इतक्या रक्कमेची मागणी केली व तडजोडीअंती रूपये ५०,०००/— रक्कम स्विकारली म्हणून माझी नमुद लोकसेवकाविरुध्द कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.

सत्र न्यायालय, मुंबई येथील कोर्ट रूम नं. १६ मधील लोकसेवक अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्री. मंगेश आरोटे यांचेशी माझे पुर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी आर्थिक देण्या—घेण्याचे व्यवहार नाहीत.

माझा जबाब संगणकावर मराठीमध्ये टंकलिखीत केला असून तो मला हिंदीतून समजावून सांगितला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

(उमेश गौंड)

पोलीस निरीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

30/8/19

Scanned by CamScanner

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ........ निरंक

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ........ –

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) ........

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ........ –

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचेविरुध्द दाखल गुन्हा सत्र न्यायालय, मुंबई येथे न्यायप्रविष्ठ आहे. फिर्यादी यांना नमुद गुन्ह्यातुन दोषमुक्त करण्याकरीता फिर्यादी यांचेकडे रु. ५,००,०००/- इतक्या रक्कमेची मागणी केली व तडजोडीअंती रु. ५०,०००/- स्विकारण्याचे कबुल केले. फिर्यादी यांची आलोसे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. २१/०८/२०१९ रोजीच्या सापळापुर्व / सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांनी फिर्यादी यांचेकडे लाच रक्कम रु. ५०,०००/- स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणुन भ्र.प्र. अधिनियम १९८८ (सुधारित २०१८) कलम - ७ अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

श्री. उमेश रमेश गौड, पोलीस निरिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P.S ........, District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा [signature] 30/8/19

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही [signature] 30/8/19

Signature of Officer In-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ...... उमेश रमेश गौड

पदनाम Rank ...... पोलीस निरिक्षक

तपासिक अं. चा कोड. क्र. ला.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, ~~2.~~ फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Received [signature] 30/8/19

Scanned by CamScanner